I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** करमाळा **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0533 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/06/2025 18:13 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 12/02/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 12/06/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 10:41 तास **Time To (वेळेपर्यंत):** 11:38 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 30/06/2025 **Time (वेळ):** 18:02 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 028 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 30/06/2025 18:02 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 20 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पोफळज ता करमाळा ,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बाबूराव मच्छिंद्र साळवे

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| **S. No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्र क्रमांक)** |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्ता प्रकार)** | **Address (पत्ता)::** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोंधवडी, ता करमाळा, करमाळा , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोंधवडी, ता करमाळा, करमाळा , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9922098700

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. दिग्विजय आबासाहेब जाधव | | | 1. Town/Village (शहर / गाव): जेऊर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि. 30/06/2025
मी बाबूराव मच्छिंद्र साळवे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती, रा. पोंधवडी, ता. करमाळा, जि. सोलापूर मो.नं. 9922098700 समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की,
मी दि. 11/02/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक, श्री उमाकांत महाडिक यांचेशी संपर्क साधुन माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावरुन पोनि महाडिक यांनी मला दि. 12/02/2025 रोजी 10.00 वा. चे सुमारास करमाळा ते जेऊर रोडवर जेऊर येथील श्री रामनारायण पार्क येथे येण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी

सदर ठिकाणी येवुन थांबलो असता तेथे काही वेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने तेथे आले. पोनि महाडिक यांनी मला वाहनात बसण्यास सांगुन वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांची व माझी एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतलो की,

माझी आई श्रीमती कमल मच्छिंद्र साळवे हिचे नावे मौजे उमरड ता. करमाळा येथे असलेली शेती जमीन गट नंबर 316/2 मध्ये पोल उभे करुन विद्युत कनेक्शन देण्याकरीता महावितरण कार्यालय जेऊर येथील सहा.अभियंता श्री. जाधव हे माझ्याकडे 60,000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता 10,000/- रुपये देण्यास सांगत असुन सदरची रक्कम ही कोणतीही शासकीय फि नसुन लाच रक्कम असल्याची माझी खात्री आहे. मला त्यांना कोणतीही लाच रक्कम देण्याची इच्छा नसुन माझा त्यांचेशी कोणत्याही प्रकारचा भांडण तंटा अगर पैशाचा देण्या घेण्याचा व्यवहार नाही. तरी लाच मागणी करणारे जाधव साहेब यांचे विरुध्द माझी तक्रार असुन त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली व तशी सविस्तर हस्तलिखित तक्रार नोंदविली. त्यानंतर पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहीती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर सहा.अभियंता दिग्विजय जाधव यांच्यावर महावितरण कार्यालय जेऊर येथे पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने पोनि महाडिक यांनी मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझी बुलेट मोटार सायकल क्रं. एम एच 12 आर व्ही 421 वरुन महावितरण कार्यालय जेऊर येथे 10.41 वा. चे सुमारास पाठविले. त्याप्रमाणे आम्ही महावितरण कार्यालय जेऊर येथे गेलो. तेथे सहा.अभियंता दिग्विजय जाधव हे उपस्थित नव्हते. त्यावेळी मी माझे मोबाईल क्रमांक 9226487271 वरुन दिग्विजय जाधव यांचे मोबाईल क्रमांक 9029107782 वर फोन करुन जाधव साहेब आलतो ऑफिसला असे सांगीतलो. त्यावर सहा.अभियंता दिग्विजय जाधव यांनी मी इथ पोफळजला आलतो असे सांगीतले. त्यावेळी मी किती वेळ आहे इकडं यायला असे विचारले असता सहा.अभियंता दिग्विजय जाधव यांनी तास..दोन तास जातील येत असतील तर या इकडं असे म्हणुन फोन कट केला. त्यानंतर मी पंच 01 यांच्यासह पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी 11.02 वा. चे सुमारास परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण खात्री केली.

सहा.अभियंता दिग्विजय जाधव हे त्यांचे कार्यालयीन कामानिमीत्त पोपळज येथे असल्याने पोनि महाडिक यांनी मला पंच 01 यांचेसह पोपळज येथे जावून दिग्विजय जाधव यांची समक्ष भेट घेवुन पडताळणी करण्याचे सांगून मला तसेच पंच 01 यांना पुन्हा पडताळणी कारवाईचे अनुषंगाने योग्य त्या सुचना देवुन त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्या बुलेट मोटार सायकलवरुन पोपळज या गावी 11.11 वा. चे सुमारास पाठविले. त्याप्रमाणे आम्ही पोपळज येथे जावून त्याठिकाणी मी माझे मोबाईल नंबरवरुन दिग्विजय जाधव यांना त्यांचे मोबाईल क्रमांकवर फोन करुन पोफळजमध्ये कुठशी हाय तुम्ही असे विचारले त्यावर लोकसेवक दिग्विजय जाधव यांनी पोफळजमध्ये पुढ या सरळ असे म्हणून पुढे काही अंतरावर सहा.अभियंता दिग्विजय जाधव यांनी माझ्याकडे बघून हात केला त्यावेळी मी पंचासह त्यांचे जवळ

जावून माझे विद्युत कनेक्शनचे अनुषंगाने चर्चा केली. त्यावेळी मी तेवढे करून टाका पोलच..एकच पोल हाय.. डी.पी.. करून घ्या असे म्हणलो असता त्यावर जाधव यांनी करतो शंभर टक्के करतो काय अडचण नाही असे म्हणून हाताने लाच मागणीचा इशारा करुन हयच राहू दे पोल बील उभा राहिल्यावर दया. आताच काही नाही अडचण असे म्हणाले. लोकसेवक दिग्विजय जाधव यांनी यापुर्वी पहीला हप्ता म्हणुन माझ्याकडे 10,000/- रुपयांची मागणी केलेली असल्याने त्याबाबत खात्री होण्याकरीता मी कसाय तुम्ही म्हणला होता दहा हजार रुपये दया... असे म्हणालो असता लोकसेवक दिग्विजय जाधव यांनी देखील होकारार्थी मान डोलवून हं..हं.. असे म्हणुन होकार दिला. व पोल उभा राहिल्यावर मग दया. दहा - पंधरा दिवसांनी.. काम करतो मी तुमच कामाच काय टेन्शन घेवू नका.. असे म्हणुन काम पुर्ण झाल्यानंतर लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली. त्यावेळी मी देवून टाकतो घडीभरात तुम्हाला भाऊ आल्यावर मग.. असे म्हणुन थोडयावेळात आणुन देतो असे सांगीतलो. त्यावर लोकसेवक दिग्विजय जाधव यांनी लागलीच लाच रक्कम घेण्यास नकार देत पोल उभा राहिल्यावर मग दया. असे म्हणुन काम पुर्ण झाल्यानंतर लाच रक्कम देण्यास सांगीतली. त्यामुळे मी पंच 01 यांच्यासह पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी 11.38 वाजता परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण खात्री केली.

सहा.अभियंता दिग्विजय जाधव यांनी माझे शेतातील विद्युत शेती पंपाचे कनेक्शन करीता विद्युत पोलची उभारणी करुन विद्युत कनेक्शन देण्याकरीता माझ्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम पोल उभा केलेनंतर देण्यास सांगीतले. त्यामुळे पुढील कारवाई ही कामपुर्ण झाले नंतर करण्याचे ठरवून पुढील कारवाई स्थगीत करण्यात आली.

त्यानंतरचे कालावधीमध्ये मी लोकसेवक दिग्विजय जाधव यांचेकडे वारंवार पाठपुरावा केला परंतु अद्याप पावेतो देखील त्यांनी माझे काम पुर्ण न करता फक्त विद्युत पोल उभारणीचे काम पुर्ण केले असुन विद्युत कनेक्शनच्या अनुषंगाने पुढील कोणतेही काम पुर्ण केलेले नाही. त्यामुळे सदर कालावधीमध्ये मी सहा.अभियंता श्री. दिग्विजय जाधव यांना वेळोवेळी फोन केला तसेच समक्ष भेटण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच लाच रक्कमेच्या अनुषंगाने काहीएक बोलत नाहीत. लोकसेवक दिग्विजय जाधव यांना माझा काहीतरी संशय आला असावा त्यामुळे ते माझेकडे लाच रक्कमेची मागणी करत नाहीत तसेच माझे काम देखील पुर्ण करत नसावेत अशी माझी शंका आहे. तसेच यापुढे देखील सहा.अभियंता श्री. दिग्विजय जाधव हे लाच रक्कमेच्या अनुषंगाने माझ्याशी संपर्क साधतील अथवा माझ्याकडुन लाचेच्या रक्कमेचा स्विकार करतील असे मला वाटत नसुन दि. 12/02/2025 रोजी झालेल्या पडताळणी कारवाईमध्ये सहा.अभियंता श्री दिग्विजय जाधव यांनी माझी आई श्रीमती कमल मॉच्छद्र साळवे हिचे नावे मौजे उमरड ता. करमाळा येथे असलेल्या शेतजमीनीमध्ये विद्युत पोल उभे करुन विद्युत कनेक्शन देण्याकरीता पहीला हप्ता म्हणुन 10,000/- रुपये दया असे म्हणून लाचेची मागणी केली असुन सदर पडताळणी कारवाईवरुन त्यांच्यावर पुढील योग्यती कारवाई करणेबाबत विनंती करुन तसा दि. 31/05/2025 रोजी जबाब दिला आहे. सदर कालावधीमध्ये मी, माझ्याकडे पैशाची मागणी करत असलेले सहा.अभियंता दिग्विजय जाधव यांचेबाबत माहीती काढली असता दिग्विजय जाधव यांचे संपुर्ण नाव श्री. दिग्विजय आबासाहेब जाधव, पद- सहाय्यक अभियंता, नेमणूक महाराष्ट्र राज्य विज

वितरण कंपनी मर्या. शाखा कार्यालय जेऊर ता. करमाळा जि. सोलापूर असे असल्याबाबत माहीती मिळाली असुन त्याबाबत मी खात्री केली आहे.

तरी दि. 12/02/2025 रोजी 10.41 ते 11.38 वा.चे दरम्यान श्री. दिग्विजय आबासाहेब जाधव, पद सहा.अभियंता, महावितरण कार्यालय जेऊर यांनी माझी आई श्रीमती कमल मच्छिंद्र साळवे हिचे नावे मौजे उमरड ता. करमाळा येथे असलेली शेती जमीन गट नंबर 316/2 मध्ये शेती पंपाचे विद्युत कनेक्शन करीता महावितरण कार्यालय जेऊर यांचेकडून विद्युत पोलची उभारणी करुन विद्युत कनेक्शन देण्याकरीता माझ्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्वत:चा वैयक्तिक आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला असल्याने माझी सहा.अभियंता श्री. दिग्विजय आबासाहेब जाधव यांच्याविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा शासकिय विश्रामगृह करमाळा येथे लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा फिर्यादी

जबाब दिला स.ता.म.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** RANJEET NARAYANRAO MANE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RANJEET NARAYANRAO MANE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** DCPS15101000402RNMM7801H

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**